# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- २१६** **दिनांक :- १४/०८/२०२१**

## घरफोडी करणा-या सराईत चोरास अटक करुन गुन्हयात चोरीस गेला माल हस्तगत.

दिनांक ०९.०८.२०२१ रोजी फिर्यादी ओम दिपक पोतदार, वय १९ वर्षे, हे कामानिमीत्त घराबाहेर गेले असतांना अज्ञात चोरटयाने घरात प्रवेश करुन लोखंडी कपाटाचे लॉकर मधील सोने-चांदीचे दागिने व रोख रक्कम तसेच घरात ठेवलेले ३ मोबाईल फोन असा एकुण ०२,५६,७४०/- रु. किं. चा माल घरफोडी चोरी करुन नेला होता. सदरबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नवघर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I ५४८/२०२१ भा.दं.वि.सं.कलम ३८०, ४५४ प्रमाणे अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला होता.

मिरा-भाईंदर पसिरात घरफोडी चोरीचे वाढते प्रमाण लक्षात घेता गुन्हयाची लवकरात लवकर उकल होण्याबाबत मा. वरिष्ठांनी आदेश दिले होते. त्याअनुषंगाने नवघर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटिकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचे घटनास्थळ व आजुबाजुचे परिसराची पाहणी केली. तसेच बातमीदाराकडून प्राप्त माहितीच्या आधारे व तांत्रिक बांबीचा वापर करुन संशईतास निष्पन्न करुन त्यास सापळा लावून ताब्यात घेवून त्याच्याकडे कौशल्यपुर्ण व कसुन तपास करता त्याने सदरील गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यास सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. नमुद अटक आरोपीताकडुन त्याने घरफोडी करुन चोरी केलेली संपुर्ण मालमत्ता हस्तगत करुन अवघ्या ४८ तासांत सदर गुन्हयाची उकल करण्यात आली आहे.

आरोपीताचा अभिलेख पडताळणी करता त्याचेविरुध्द माटुंगा, डी. बी. मार्ग, व्ही. पी. रोड, समतानगर पो. ठाणे, मुंबई तसेच तुळींज पो. ठाणे, मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय अशा ठिकाणी १३ गुन्हे दाखल असल्याची माहिती मिळुन आलेली आहे.

सदरची कामगिरी श्री. अमीत काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ. शशीकांत भोसले, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पोनि/प्रकाश मासाळ (गुन्हे) सपोनि/योगेश काळे, पोउनि/संदिप ओहळ, पोना/१४१८ रविंद्र भालेराव, पोना/२९५६ ऐन्नोद्दीन शेख, पोशि/३४५८ संदिप जाधव,पोशि/२८३८ युनुस गिरगावकर, पोशि/५१० अनील सुर्वे, यांनी केली आहे.